ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55027


# अर्थ


LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ११ | पुणे, बुधवार, १ एप्रिल, १९७० | अंक ७




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ — तार : Vijayplow

# विविध माहिती

**टागोरांच्या ग्रंथांच्या पाकिस्तानी आवृत्त्या** —रवींद्रनाथ टागोरांच्या बंगाली भाषेतील ग्रंथांच्या पाकिस्तानसाठी खास आवृत्त्या काढण्याची सूचना ऑक्सफर्ड विद्यापीठाने विश्वभारती विद्यापीठाला केली आहे. विश्वभारती ह्या सूचनेचा विचार करीत आहे. सध्या पूर्व पाकिस्तानात टागोरांच्या बंगाली ग्रंथांच्या आवृत्त्या बेकायदा काढण्यात येऊन प्रसृत करण्यात येत आहेत. ह्या प्रकाशनांना आळा घालता आलेला नाही.

**उत्तर प्रदेशातील हातमाग संकटात** — उत्तर प्रदेशातील हातमागाच्या धंद्याची परिस्थिती फारच बिकट झाली आहे. या धंद्यात गुंतलेल्या २० लाख लोकांचे जिणे त्यामुळे धोक्यात आले आहे. हातमागासाठी लागणारे सूत, वस्त्रांना द्यावयाचे रंग, कापूस, रेशीम, इत्यादींच्या किमती एकदम वाढल्याने विणकरांना आपला माल उत्पादनाच्या खर्चापेक्षाही कमी भावात विकावा लागत आहे.

**फोटो काढण्याचा कागद दुर्मिळ**—स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने फोटो काढण्याचा कागद आयात करण्याचे बंद केले आहे. ह्या कागदाचे देशातील उत्पादन मागणीपेक्षा बरेच कमी आहे. त्यामुळे ह्या कागदाचा काळाबाजार फोफावला आहे. दिल्ली येथील एका प्रमुख फोटोग्राफरने अशी माहिती दिली की दिल्लीतील फोटोग्राफरांना कागद मिळविण्यासाठी दरसाल १ कोटी,६८ लाख रुपये काळा पैसा व्यापाऱ्यांना द्यावा लागतो.

**अनाठायी खर्चावर टीका**—भारतीय मालाची परदेशात जाहिरात करण्यासाठी ठेवण्यात येणारी काचेची कपाटे फारशी उपयोगी ठरत नाहीत; त्यावरील खर्च फुकट जातो अशी टीका लोकसभेच्या सार्वजनिक हिशेब समितीने केली आहे. कैरो येथील अशा काचपेटीवर १९६६ ते १९६९ पर्यंत ६.१५ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे उदाहरण समितीने दिले आहे.

**सुएझ कालव्याच्या बंदीचा परिणाम** – १९६७ साली अरब-इस्राइल ह्यांच्यात युद्ध झाल्यापासून सुएझच्या कालव्यातून होणारी बोटींची वाहतूक थांबली आहे. त्याचा एक परिणाम असा झाला आहे की तांबड्या समुद्रातील १२० प्रकारचे जलचर प्राणी पूर्व भूमध्य समुद्रात आले आहेत. त्यात मोती घालणाऱ्या जलचरांचाही समावेश आहे. काही कोळी त्याचा फायदाही घेत आहेत.

**न्यायाधीशांच्या पगाराचा विचार** —सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्ट ह्यांत काम करणाऱ्या न्यायाधीशांच्या पगाराचा फेरविचार करण्याचे घाटत आहे. ह्या न्यायाधिकाऱ्यांचे पगार १९५७ साली ठरविण्यात आले आहेत. महागाई वाढल्यामुळे ह्या जागांवर काम करण्यासाठी सध्याच्या पगारावर हुशार माणसे मिळणे कठीण झाले आहे.

**टाटांची नवी प्रकाशन कंपनी**—अमेरिकेतील मॅकग्रॉ पब्लिशिंग कंपनीच्या कोलॅबोरेशनने टाटा ट्रस्टला एक पुस्तक प्रकाशन कंपनी काढण्यास सरकारने परवानगी दिली आहे. कंपनीमधील परदेशाची गुंतवणूक ४०% पेक्षा अधिक असता कामा नये आणि कंपनीच्या पुस्तक विक्रीच्या १०% तरी विक्री परदेशात झाली पाहिजे, अशा अटी आहेत.

**हिंदुस्थान लिव्हरची १०८.५९ कोटी रु. ची विक्री** – हिंदुस्थान लिव्हर लि. ने १९६९ मध्ये १०८.५९ कोटी रु. ची विक्री केली; १९६८ मधील विक्री ९२.५९ कोटी रु. होती. डिव्हिडंडचा दर १४% पडला.

**भिकाऱ्यांचे निर्बीजीकरण**— मुंबईमधील भिकाऱ्यात निर्बीजीकरणाचा प्रचार करण्यात येत आहे. चेंबूरमधील भिक्षेकरी केंद्रातील ५० भिक्षेकऱ्यांनी अशा शस्त्रक्रियेला संमती दिली आहे. शस्त्रक्रिया करवून घेणाऱ्याला प्रत्येकी २० रुपये दिले जातात.

**२५ कोटी रु. ची चोरटी आयात पकडली** – १९६९ मध्ये २५.०१ कोटी रुपयांची चोरटी आयात पकडण्यात आली. त्यात सोने, चांदी, घड्याळे, कृत्रिम कापड आणि सूत, इत्यादींचा समावेश होता.

**बचावासाठी ४.५४ लक्ष रु.** —बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध सुप्रीम कोर्टात अर्ज करण्यात आले, त्याविरुद्ध बचाव करण्यासाठी मध्यवर्ती सरकारला ४.५४ लक्ष रु. खर्च आला.

**रेडिओवरील जाहिरातींचे उत्पन्न**—रेडिओवरील वेळ जाहिरातींसाठी भाड्याने दिल्यामुळे आकाशवाणीला १९६९–७० मध्ये १.९२ कोटी रु. उत्पन्न मिळाले. दररोज एकूण ८४ मिनिटे सध्या अशी भाड्याने दिली जातात. मुंबई केंद्राला ५७.७६ लक्ष रु., कलकत्ता केंद्राला ५४.९४ लक्ष रु., दिल्ली केंद्राला ४३ लक्ष रु. आणि मद्रास केंद्राला ३६ लक्ष रु. मिळाले. एका जाहिरातदाराने सर्वात जास्त म्हणजे ३.९२ लक्ष रु. भाडे दिले.

**न्यूयॉर्कमधील पोस्टमनांचा संप** —न्यूयॉर्कमधील पोस्टमनांनी संप पुकारला आहे. त्यांना प्रारंभीचा पगार दरमहा ४,००० रु. असतो, तो २१ वर्षांनी दरमहा ८,००० रु. होतो. परंतु त्यानंतर वाढ होत नाही, अशी त्यांची तक्रार आहे.

**डॉ. मेनन एफ. आर. एस. झाले** –टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे डायरेक्टर, डॉ. एम. जी. के. मेनन ह्यांची रॉयल सोसायटीचे फेलो म्हणून निवड झाली आहे. आतापर्यंत १६ हिंदी शास्त्रज्ञांना हा मान मिळाला आहे, त्यांपैकी प्रो. बोस, प्रो. राव, प्रो. महालनवीस, प्रो. शेषाद्री, डॉ. रामन आणि प्रो. चंद्रशेखर हे हयात आहेत.

☆ अर्थ ☆

बुधवार, १ एप्रिल, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## भारतातील संशोधनावर खर्च

### बोजाचे तुलनात्मक आकडे

विकसनशील देशांतील शास्त्रीय संशोधनावरील खर्चाची विकसित देश आता छाननी करू लागले आहेत. विकसित देशांतील संशोधनाचे आयते फळ त्यांना मिळत असताना त्यांनी स्वतः आणखी कशाला खर्च करावयाचा, अशी एक विचार-प्रणाली आहे.

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानाने त्याचा संशोधना-वरील खर्च अत्यल्प आहे, अशी हिंदी शास्त्रज्ञांची तक्रार आहे. वीस वर्षांपूर्वी तो ०·२% होता, तो वाढून पांच वर्षांपूर्वी ०·३२% वर आला आणि आता सुमारे ०·५% आहे. ह्याउलट, विकसित देश आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन ते चार टक्के संशोधनावर खर्च करतात. 'कॉन्फरन्स ऑन दि ॲप्लिकेशन ऑफ सायन्स ॲंड टेक्नॉलॉजी टु दि डेव्हलपमेंट ऑफ एशिया'ने आशियातील देशांनी किमान १% खर्च करावा, असे सुचविले होते.

प्रत्येक शास्त्रज्ञावर भारतात दर साल सुमारे ३८,००० रु. खर्च होतो. ग्रेट ब्रिटनमध्ये तोच खर्च १२,५०० पौंड (२,२५,००० रु.) आहे. अमेरिकेत तर तो ५०,००० डॉलर (३,७५,००० रु.) आहे.

ह्याचा अर्थ, एकूण उत्पन्नाशी पडणारे प्रमाण आणि दर शास्त्रज्ञावर होणारा खर्च, ह्या दोन्ही दृष्टींनी भारताचा खर्च फार कमी आहे.

भारत प्रत्येक शास्त्रज्ञावर दरसाल ३८,००० रु. खर्च करतो, पण भारतीयांचे दर माणशी उत्पन्न फक्त ५६० रु. आहे. म्हणजे, दर माणशी उत्पन्नाच्या ६८ पटीएवढा प्रत्येक शास्त्रज्ञावर खर्च होतो. अमेरिकेत हे प्रमाण १४ पट आणि ग्रेट ब्रिटनमध्ये २२ पट असे पडते. अशा परिस्थितीत भारताला संशोधनावर अधिक खर्च करणे परवडणारे नाही असा मुद्दा मांडला जातो. त्याला उत्तर म्हणून असे सांगितले जाते, की संशोधनाच्या खर्चाचा पडणारा बोजा औद्योगिक आणि कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या बोजापेक्षा कितीतरी हलका आहे. दर माणशी दर दिवशी राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला, तर एक पत्र पाठवायला अमेरिकेच्या दर दिवशी राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% खर्च येतो. भारतात तेच प्रमाण १३% आहे. म्हणजे एक पोस्टाचे तिकीट भारतात विकत घेणे अमेरिकेत विकत घेण्यापेक्षा १३ पट महाग आहे. ह्याच विचारसरणीप्रमाणे, ग्रेट ब्रिटनपेक्षा भारतात लोणी ५० पट महाग आहे. उद्योगधंद्यांना लागणारी वीज अमेरिकेपेक्षा ६० पट महाग आहे. कॉस्टिक सोडा अमेरिकेपेक्षा भारतात ६१ पट महाग आहे. ग्रेट ब्रिटनपेक्षा ३१ पट महाग आहे.

ह्यावरून दिसून येईल, की गरजेच्या जिनसा भारतात फारच महाग आहेत; त्या मानाने संशोधनाचा बोजा अवास्तव नाही. शास्त्रज्ञावर होणारा खर्च विकसित देशांपेक्षा ४ ते ५ पट मोठा आहे. परंतु, गरजेच्या जिनसांवरील खर्च त्यापेक्षा कितीतरी पट मोठा आहे.

### संशोधनावरील खर्चाचा तुलनात्मक तक्ता

| | अमेरिका | ग्रेट ब्रिटन | भारत |
|---|---|---|---|
| १ राष्ट्रीय उत्पन्न | ७,००,००० दशलक्ष डॉलर | ३१,००० दशलक्ष डॉलर | २,८८,००० दशलक्ष रुपये |
| २ लोकसंख्या | २०० दशलक्ष | ५५ दशलक्ष | ५१५ दशलक्ष |
| ३ दर माणशी दरसाल राष्ट्रीय उत्पन्न | ३,५०० डॉलर | ५६० पौंड | ५६० रुपये |
| ४ दर माणशी दररोजचे राष्ट्रीय उत्पन्न | ९·६ डॉलर | १·५ पौंड | १·५ रुपये |
| ५ संशोधनावर वार्षिक खर्च | २५,००० दशलक्ष डॉलर | ८८० दशलक्ष पौंड | १,५०० दशलक्ष रु. |
| ६ शास्त्रज्ञ | ५,००,००० | ७०,००० | ४०,००० |
| ७ प्रत्येक शास्त्रज्ञावरचा वार्षिक खर्च | ५०,००० डॉलर | १२,५०० डॉलर | ३८,००० रु. |
| ८ दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नाशी दर शास्त्रज्ञावरील खर्च (७ ला ३ ने भागून) | १४ | २२ | ६८ |

(१ पौंड = २४ डॉलर = १८ रु.)

# श्री शंतनुरावांच्या कार्याचा गौरव

## इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे ऑनररी लाइफ मेंबर



[ इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) ने श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांस आपले ऑनररी लाइफ मेंबर केले आहे. इन्स्टिटयूटने आपल्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी श्री. शंतनुरावांचा अशा रीतीने नुकताच गौरव केला. त्यासोबतच्या गौरवपत्रिकेत त्यांच्या कार्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. ते आम्ही जसेच्या तसे खाली देत आहो. ]

**गौरवपत्रिका**

### श्री. शंतनु लक्ष्मण किर्लोस्कर

श्री. शंतनु लक्ष्मण किर्लोस्कर ह्यांचा जन्म २८ मे, १९०३ रोजी झाला. भारतातील शिक्षण संपविल्यावर ते अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये दाखल होऊन १९२६ मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे ते पदवीधर झाले. त्याच वर्षी भारतात परत आल्यावर त्यांनी आपल्या घरच्या उद्योगधंद्यास स्वतःला वाहून घेतले. कार्यक्षमता आणि उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी आपल्या कारखान्याची पुनर्रचना केली. लोखंडी नांगर, भुईमूग सोलण्याची यंत्रे आणि उसाचे चरक ह्यांचे उत्पादन वाढविण्यात त्यांनी यश मिळविले. लवकरच त्यांनी सेंट्रिफ्युगल पंप, डिझेल इंजिने आणि मशीन टूल्स ह्यांच्या उत्पादनाकडे लक्ष वळविले आणि त्यांच्या निर्मितीच्या विस्ताराचे कार्यक्रम कार्यान्वित केले. त्यांची गती त्यांनी अखंड चालू ठेवली आहे. मंदीच्या काळातून यशस्वी रीतीने मार्ग काढून आणि दुसऱ्या महायुद्ध काळातून बाहेर पडून श्री. किर्लोस्कर ह्यांच्या अत्यंत कर्तृत्वशाली नेतृत्वाखाली किर्लोस्कर कंपन्यांनी झपाट्याने प्रगती केली आहे.

आता अकरा किर्लोस्कर कंपन्या, त्यांच्या सह-कंपन्या आणि स्वतःच्या उत्पादनांचे वितरण करणाऱ्या खास यंत्रणा सुमारे ३०,००० माणसांना रोजगार पुरवीत आहेत; इलेक्ट्रिक मोटर्स, मशीन टूल्स, डिझेल ऑइल एंजिन्स आणि एअर कॉम्प्रेसर्स ह्यांसारखी विविध प्रकारची इंजिनिअरिंग यंत्रे तयार करून त्यांची विक्री करीत आहेत. भारतात, खासगी क्षेत्रात, ह्या उत्पादनक्षेत्रात किर्लोस्कर कारखानेच सर्वांत मोठे आहेत. जगातील कुठल्याही देशातील अत्याधुनिक कारखान्यांशी ह्या सर्व किर्लोस्कर कारखान्यांची उत्पादनाच्या बाबतीत तुलना होते.

भारताच्या शेती-उत्पादनाने नुकतीच कोंडी फोडली आहे—ज्याला 'हरित क्रांती' असे म्हटले जाते—त्याचे बरेचसे श्रेय किर्लोस्करांना आहे. कारण, त्यांच्या घराण्यातील माणसे ह्या दृष्टीने गेली ७० वर्षे सतत प्रयत्नशील आहेत. श्री. किर्लोस्करांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे "जुन्या बाजारपेठांतील बदलत्या परिस्थितीचा अभ्यास आम्ही सतत चालू ठेवला पाहिजे. जे देश आमचा माल आयात करण्यास राजी नसतात, परंतु आमचे सहकार्य घेऊन स्वतःचे उद्योगधंदे वाढविण्यास तयार असतात, अशा देशांशी कोलॅबोरेशनच्या संधीकडे जागृतपणे लक्ष ठेवणे, हा एक आमचा नवा विकासमार्ग आहे".

श्री. किर्लोस्कर २० कंपन्यांच्या संचालक मंडळात संचालक आहेत. (भारतातील प्रचलित कायद्याप्रमाणे ह्यापेक्षा जास्त कंपन्यांचे संचालक कुणालाही होताच येत नाही.) त्यांत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (सेंट्रल बोर्ड) आणि इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बँक ह्यांचाही समावेश आहे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, ह्या भारतातील सर्व चेंबर्सच्या केंद्र संस्थेचे ते १९६५–६६चे अध्यक्ष होते. भारत सरकारला सल्ला देणाऱ्या बोर्ड ऑफ ट्रेडचे ते सरकारनियुक्त सभासद आहेत. लंडनमधील इन्स्टिटयूट ऑफ प्रॉडक्शन इंजिनिअर्सने श्री. किर्लोस्कर ह्यांना भारतातील त्यांच्या दीर्घ, निष्ठापूर्वक कामगिरीच्या गौरवाप्रीत्यर्थ सर वॉल्टर पके प्राइझ दिले आहे.

श्री. किर्लोस्करांच्या उद्योगसमूहाचा व्याप एकसारखा वाढत आहे. त्याचे नेतृत्व ते सौम्यपणे परंतु प्रभावी रीतीने करतात. स्वतःचे कारखाने उत्कृष्ट पायावर उभारण्याकडे ते आपल्या सर्व वेळेचा विनियोग करतात; त्यांचे जीवन समाधानानेही समृद्ध आहे.

---

**प्राणिसंग्रहालयातील प्रेमातुर विधुर-विधवा**—दिल्लीमधील प्राणिसंग्रहालयात २८ विधुर आणि विधवा प्रेमातुर जनावरे आहेत. त्यांच्या वयाला अनुरूप भिडू मिळविण्याचे प्रयत्न परदेशात चालू आहेत. हा प्रश्न जगातील सर्वच प्राणिसंग्रहालयांपुढे असतो. हूलॉक गिबन, चिंपँझी, गोल्डन कॅट, उंट, कँगरू, अमेरिकन अस्वल, पॉरक्युपाइन, इत्यादींचा ह्या विधुर-विधवांत समावेश आहे.

**करमणुकीच्या करमाफीमुळे १४ लक्ष रु. नुकसान**—महाराष्ट्र सरकारने १९६७-६८ आणि १९६८–६९ मध्ये काही चित्रपटांना करमणुकीचा कर माफ केला, त्यामुळे सरकारचे १४ लक्ष रु. उत्पन्न बुडाले.


---

# सहकारी पतयंत्रणेची पुनर्रचना

## स्वस्त कर्जाच्या आशेने आणि पुढारीपणाच्या आमिषाने मध्यवर्ती बँकांच्या विभाजनाला भरघोस पाठिंबा मिळेल; पण सहकारी चळवळीचे खरेखुरे हित साधेल काय ? वादीसाठी म्हैस मारण्याचा प्रकार होणार नाही ना ?

[ तालुका बँकांचा पूर्वीचा अनुभव समाधानकारक नाही; तालुकानिहाय बँका केल्यामुळे व्याजाचा दर कमी करता येईल असे वाटत नाही; तालुका पातळीवर अधिक लोकांना नेतृत्व मिळेल पण वैयक्तिक हेव्यादाव्यांना आणि संघर्षांना प्रोत्साहन मिळेल; ग्रामीण भागांचा समतोल विकास होणार नाही; प्रचलित यंत्रणेतूनच उद्दिष्ट साधण्याचे मार्ग शोधणे अधिक उचित होईल, असे प्रतिपादन करणारा आणि सहकार मंत्र्यांना घटी न विस्कटण्याचे आवाहन करणारा महत्त्वपूर्ण लेख ]

लेखक : श्री. वसंतराव दादा पाटील
चेअरमन, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.



आपल्या राज्याचे सहकार मंत्री माननीय श्री. यशवन्तरावजी मोहिते यांनी सहकारी व्यवस्थेच्या पुनर्रचनेबाबत अलीकडेच काही विचार व्यक्त केले आहेत. ( पाहाः अर्थ, ता. १८-३-७० ) शेतकऱ्याला जास्तीतजास्त ५ टक्के व्याजाने कर्ज मिळावे या हेतूने त्यांनी सहकारी पतपुरवठा यंत्रणेत बदल सुचवला आहे. पंधरा वर्षांत शेतकऱ्याला कर्जाची जरुरी राहणार नाही अशी परिस्थिती त्यांना निर्माण करायची आहे. यासाठी सध्याच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेचे विभाजन करून शेतीकर्जासाठी तालुकानिहाय बँका स्थापन करावयाच्या व इतर व्यवहार जिल्हा औद्योगिक बँकेकडे द्यावयाचा असे या योजनेचे स्थूल स्वरूप आहे.

### तालुका बँकांचा अनुभव उत्साहकारक नाही

या योजनेत मांडण्यात आलेली तालुका बँकांची कल्पना नवीन नाही. आपल्या देशातच नव्हे तर खुद्द महाराष्ट्र राज्यातही तालुका बँकांचा अनुभव आपण घेतलेला आहे. तालुका बँकांकडून भरीव कार्य न झाल्यामुळे या सर्व बँकांचे एकत्रीकरण करून जिल्हावार सहकारी बँका स्थापन करण्यात आल्या. पश्चिम महाराष्ट्रात जिल्हा बँकांनी केलेल्या कार्याची परिणामकारकता पाहून शेवटी रिझर्व्ह बँकेच्या रुरल क्रेडिट सर्व्हे कमिटीने सर्व देशात जिल्हा पातळीवर बँका स्थापन करण्याची शिफारस केली. भारत सरकारनेही हे धोरण मान्य केले. त्यामुळे सबंध देशातील सहकारी पतयंत्रणेची राज्य बँक, जिल्हा बँक व सोसायटी अशा तीन स्थरांवर फेररचना करण्यात आली.

### विभाजनामुळे व्याज कमी होणार नाही

तालुकानिहाय बँका केल्यामुळे व्याजाचा दर कसा कमी होणार ते कळत नाही. कारण आज जो खर्च जिल्हा बँक करते तो तालुका बँकेला करावाच लागणार. कारण, पैशाचे व्यवहार करण्यासाठी तालुका बँकांनाही कार्यक्षम व अनुभवी सेवक नेमावेच लागतील. असा सेवकवर्ग तालुका बँकांनाच काही अल्प वेतनावर मिळणार नाही. त्यांच्या खर्चाचा बोजा हा जिल्हा बँकेच्या तुलनेने कमी व्यवहारावर पडणार आहे. त्यामुळे कर्ज व्यवहाराच्या प्रमाणात खर्चाचे मान वाढण्याचाच संभव जास्त. त्याचप्रमाणे सोसायट्यांचे सेक्रेटरी हे तालुका बँकांचे सेवक राहावे असेही नव्या योजनेत अभिप्रेत आहे. केवळ या सेक्रेटरींचाच पगार इत्यादी खर्चासाठी कर्जव्यवहाराच्या सुमारे एक-दीड टक्का खर्च येणार आहे. सोसायट्यांचे आज जिल्हा बँकेत असणारे शेअर भांडवल तालुका बँकांना मिळेल आणि या पैशाचा उपयोग कर्जव्यवहारात केल्यामुळे व्याज कमी ठेवणे त्यांना परवडेल असाही विचार नव्या योजनेत आहे. येथे एक गोष्ट विचारात घेतलेली दिसत नाही, ती म्हणजे थकबाकी. आज सभासदांकडून येणे कर्जापैकी ३० टक्क्यांहून जास्त रक्कम मुदतबाह्य आहे. अशा रकमेपोटी राज्य बँक व रिझर्व्ह बँक यांचेकडून कर्जाची

भरपाई मिळत नाही. त्यामुळे शेअर भांडवल थकबाकी सामावण्यातच संपणार. काही काही कोरडवाहू तालुक्यांत तर थकबाकीचे मान ४० टक्क्यांपर्यंत आहे. बऱ्याचशा तालुक्यांत थकबाकी पेलण्यास शेअर भांडवल अपुरे पडेल. आज जिल्हा बँकांमध्ये शेती व बिगर शेतकी कर्जव्यवहार आणि सुपीक व नापीक विभाग यांचा समतोल साधला जातो आणि म्हणून थकबाकीचा बोजा सहन करणे जिल्हा बँकांना शक्य होते. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे तालुका बँकांमुळे व्याजाचा दर कमी करणे शक्य होईल असे वाटत नाही.

### स्थानिक संघर्ष तीव्र होतील

तालुका बँकांमुळे आजची जी पतपुरवठ्याची एकसंध व कार्यक्षम यंत्रणा आहे ती विस्कळीत होईल. विकेन्द्रीकरण जसजसे खालच्या पातळीवर जाते तसतसे मतभेद व सत्तास्पर्धा अधिकाधिक तीव्र होत जाते. राज्य पातळीवर अशा संघर्षाची तीव्रता फारशी जाणवत नाही. राज्य पातळीपेक्षा जिल्हा पातळीवरच असे संघर्ष अधिक महत्त्वाचे ठरतात. तालुका पातळीवर तर वैयक्तिक संघर्ष जास्तच उग्र स्वरूप धारण करतील आणि त्यांचा कर्जवसुलीवर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. तालुका बँकांच्या निर्मितीमुळे अशा प्रकारच्या वैयक्तिक स्पर्धांना आणि हेव्यादाव्यांना प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे फुटीर वृत्तीला चालना मिळून, ग्रामीण विकासकार्याची प्रगती खुंटेल. केवळ बहुसंख्य लोकांचा पाठिंबा आहे म्हणून असा निर्णय घेणे उचित होणार नाही. स्वस्त कर्जाचे आकर्षण सर्वांनाच असते. त्याचप्रमाणे तालुका पातळीवरील नेतृत्वामुळे अधिक लोकांना पुढारीपण मिळू शकेल. त्यामुळे अशा योजनेला भरघोस पाठिंबा मिळेल यांत आश्चर्य नाही. मात्र हा बदल सहकारी चळवळीच्या हिताचा आहे की नाही याचा विचार करून अंतिम निर्णय घेतला गेला पाहिजे.

### समतोल विकास अशक्य होईल

शेती कर्जासाठी तालुका बँक आणि इतर कर्जासाठी औद्योगिक बँक याप्रमाणे व्यवस्था केल्यामुळे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचे काम अवघड होणार आहे. आज जिल्हा बँका पतपुरवठ्याबरोबरच खरेदी-विक्री संस्था, प्रक्रिया संस्था, औद्योगिक संस्था, इत्यादी विविध संस्थांना चालना देण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. शेतीव्यतिरिक्त इतर व्यवहारांसाठी जिल्हा बँकांनी केलेल्या कर्जपुरवठ्यामध्ये सालोसाल वाढ होत आहे. पीकविक्रीसाठी जिल्हा बँकांनी दिलेल्या कर्जाची रकम १९५८ ते १९६८ या दहा वर्षांत ७ कोटींपासून सुमारे तीस कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. याच काळात प्रक्रिया व औद्योगिक संस्थांना केलेल्या कर्जपुरवठ्यातही सातपट वाढ झाली असून, १९६७–६८ अखेर अशी रकम सुमारे पस्तीस कोटी रुपये होती. साखरकारखाने, तेल-गिरण्या, भात-गिरण्या, जिनिंग-प्रेसिंग संस्था, सूत-गिरण्या, खतकारखाने, इंजिनिअरिंग सोसायट्या, इत्यादी लहानमोठ्या सहकारी क्षेत्रातील व्यवसायांना जिल्हा बँकांनीच कर्जपुरवठा केला आहे. हे कार्य औद्योगिक बँकांना जमण्यासारखे नाही. कारण त्यांचा सर्व तऱ्हेच्या संस्थांशी संबंध असणार नाही. जिल्हा बँका आपल्या ८०० हून अधिक शाखांद्वारे १०० कोटी रुपयांहून जास्त रक्कम ठेवींद्वारे उभी करून या व्यवसायांना पुरवू शकतात. हे काम औद्योगिक बँकांना जमणार नाही. साखरकारखाने सोडल्यास इतर प्रक्रिया व्यवसाय आणि छोटे छोटे उद्योगधंदे यांचा आतापर्यंतचा अनुभव फारसा उत्साहजनक नाही. औद्योगिक कर्जव्यवहार हा तुलनेने जास्त धोक्याचा असल्यामुळे सर्वसामान्य ठेवीदार औद्योगिक बँकांकडे आकर्षित होणार नाहीत. याचा परिणाम म्हणजे सहकारी बँकांकडे आज ठेवींच्या रूपाने उपलब्ध असणारा पैसा सहकारी क्षेत्राबाहेर जाईल. औद्योगिक बँक ही जिल्हा बँकेची पर्यायी यंत्रणा होऊ शकणार नाही.

### प्रचलित यंत्रणाच योग्य

शेतकऱ्यांना, विशेषतः लहान लहान कोरडवाहू शेतकऱ्यांना स्वस्त व्याजाने कर्जपुरवठा झाला पाहिजे हे या योजनेमागील मूलभूत उद्दिष्ट. त्याबाबत कोणाचेच दुमत नाही. पण हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वर्षानुवर्षांच्या अनुभवांनी विचारवंत सहकारी कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक बसविलेली सहकारी व्यवस्थेची घडी विस्कटून टाकणे म्हणजे वादीसाठी म्हैस मारण्यासारखा प्रकार तर होणार नाही ना, अशी शंका आल्यावाचून राहात नाही. त्याऐवजी प्रचलित यंत्रणेतूनच हे उद्दिष्ट कसे साध्य करता येईल ते पाहणे अधिक उचित ठरेल. स्थानिक कार्यकर्त्यांवर कर्जव्यवहाराचे धोरण इ. बाबतींतील जास्त जबाबदारी टाकण्याच्या दृष्टीने तालुका अगर विभागवार सल्लागार समित्यांची स्थापना करणे इष्ट ठरेल. त्यामुळे कर्जप्रकरणे करणे, कर्जमंजुरी इ. कामे जास्त लवकर होऊ शकतील. देखरेख-व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे आणि कर्जवसुली करणे हीही कामे या समितीमार्फत जास्त परिणामकारक होतील.

### रिझर्व्ह बँकेने व्याज कमी करावे

प्रचलित देखरेख यंत्रणेच्या खर्चासाठी आणि ऑडिट व सुपरव्हिजन फी म्हणून सोसायटीला कर्जव्यवहाराच्या सुमारे दोन टक्के खर्च करावा लागतो. देखरेख-व्यवस्था जिल्हा बँकेच्या अखत्यारात आली म्हणजे जिल्हा बँकेला आज देखरेखीसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चात कपात करणे शक्य होईल. जिल्हा बँकांचे वाढते व्यवहार, विशेषतः बिगरशेती कर्जव्यवहार, लक्षात घेता त्यांना काही प्रमाणात व्याजामध्ये कपात करणे शक्य होईलसे वाटते. मात्र एवढ्यानेच भागणार नाही. सरकारनेही ऑडिट व सुपरव्हिजन फी घेण्याचे बंद करावे. त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेनेही शेतकऱ्याला लागणारे सर्व कर्ज तीन टक्क्यांऐवजी दोन टक्क्यांनी पुरविण्याबाबत विचार करावा.

# राष्ट्रीयीकरण न केलेल्या बँकांचे व्यवहार

## युनायटेड वेस्टर्न बँकेची अभिमानास्पद प्रगती

### वार्षिक सभेत अध्यक्ष श्री. वि. श्री. दामले, यांनी केलेल्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे



काही बँकांचे राष्ट्रीयीकरण करावयाचे नाही असा एकदा निर्णय घेतल्यानंतर त्या बँकांना व्यवहारवाढीला प्रोत्साहन दिले जाणे आवश्यक आहे. त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांच्या वाढीस पोषक असे वातावरण निर्माण केले जाण्याची जरुरी आहे. विशेषतः ठेवींवर जास्त व्याज देण्याची सवलत या बँकांना दिली जाणे आवश्यक आहे. तसेच नवीन शाखा उघडण्याबाबत जे धोरण ठरविले गेले आहे त्यातील काही बंधने या बँकांच्या बाबतीत शिथिल करणे जरूर आहे. लहान गावी व विशेषतः जेथे बँकिंगची सोय उपलब्ध नाही अशा जागी शाखा उघडणे राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांना जेवढे सुलभ आहे तेवढे ते इतर बँकांना नाही. त्या दृष्टीने धोरणामध्ये बदल केला जावा. तसेच शेती कर्जव्यवहारातील खाजगी बँकांच्या अडचणींकडे सहानुभूतीने पाहिले जावे.

सन १९६९ मधील बँकिंग क्षेत्रातील सर्वांत मोठी आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीवर दीर्घ परिणाम करणारी अशी घटना म्हणजे जुलै महिन्यात झालेले देशातील १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होय.

स्टेट बँक ऑफ इंडिया व तिच्या उप-कंपन्या आणि नुकत्याच राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका यांचा व्यवहार फारच मोठा असून बँकिंग क्षेत्रातील शेकडा ९० टक्क्यांवरचा भाग आता प्रत्यक्ष सरकारी नियंत्रणाखाली आला आहे.

१४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यामुळे आपल्या बँकेवर त्याचा काय परिणाम होईल हे जरी निश्चितपणे आत्ताच सांगता येत नसले तरी देखील आपल्याला फार मोठ्या स्पर्धेस तोंड द्यावे लागेल असे स्पष्ट दिसत आहे. अर्थात निरोगी स्पर्धेस बिचकण्याचे काहीच कारण नाही. कारण अशी स्पर्धा राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वीही होती. परंतु राष्ट्रीयीकरण झाल्यावर अगदी थोड्याच अवधीत राष्ट्रीयीकरण न झालेल्या बँकांना आपल्या ठेवींवरील व्याजाचे दर रिझर्व्ह बँकेने कमी करावयास लावले ही घटना या संदर्भात सूचक वाटते.

व्यापारी बँकांवर घातलेले सामाजिक नियंत्रण पुरेसे पडत नाही असे वाटल्यामुळे राष्ट्रीयीकरणाची उपाययोजना केली गेली. खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या बँकांवर जी बंधने आपोआपच पडतात त्या बंधनांमुळे बँकांना सरकारला अपेक्षित अशी उद्दिष्टे पुरी करता येणार नाहीत म्हणूनच राष्ट्रीयीकरण केले गेले असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही असे वाटते. याचा अर्थ असा की, ज्या बँकांचे राष्ट्रीयीकरण झालेले नाही त्या बँकांवर वरील बंधने अद्यापही आहेत आणि त्यामुळे त्यांच्याकडून राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या पद्धतीने कार्य करण्याची अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. खाजगी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या बँका आणि राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका यांच्यातील या फरकाची जाणीव केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक यांचे बँकिंगविषयक धोरण ठरविताना ठेविली जाईल अशी मला आशा वाटते. विशेषतः राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका शाखा-वाढीचा जो विस्तृत कार्यक्रम हातात घेत आहेत त्या संदर्भात राष्ट्रीयीकरण न झालेल्या बँकांच्या अडचणी लक्षात घेतल्या जातील अशी मला आशा वाटते.

आपल्या पंतप्रधानांनी सन १९७०-७१ सालचे जे अंदाजपत्रक मांडले आहे त्यातील समतोल व समन्वयी धोरणाचे मी स्वागत करतो. विशेषतः बँकांकडील ठेवींवरील व्याजावरही काही रकमेपर्यंत इन्कम्-टॅक्स् माफ करण्याची जी तरतूद आहे ती बँकांच्या दृष्टीने विशेष स्वागतार्ह आहे. युनिट ट्रस्ट व इतर शेअर्सवरील डिव्हिडंड व बँकांतील ठेवींवरील व्याज यांना समान लेखण्याची भूमिका या अंदाजपत्रकात स्वीकारली गेली आहे ही घटना विशेष संतोषजनक आहे. या तरतुदीमुळे बँकांकडील ठेवी वाढतील असा विश्वास वाटतो. बँका निर्माण करीत असलेला राखीव निधी इन्कम्-टॅक्समधून वगळला गेला असता तर फार चांगले झाले असते.

चालू वर्षी सर्वच बँकांच्या ठेवींमध्ये अपेक्षित वाढ होऊ शकत नाही असे दिसून येत आहे. तसेच देशात नाणेटंचाई भासत असून कर्जावरील व्याजाचे दरही वाढत आहेत. अशा परिस्थितीत बचतीला प्रोत्साहन मिळण्याकरिता बँकांनी आपल्या ठेवींवरील व्याजाचे दर वाढविणे आवश्यक आहे असे मला वाटते. रिझर्व्ह बँक याचा योग्य तो विचार करून व्याजाचे दर वाढविण्यास बँकांना परवानगी देईल अशी मी आशा करतो.

अहवाल साली आपण राखीव निधीकडे रु. १,००,००० वर्ग केलेले असून एकूण राखीव निधी आता रु. ११,००,००० इतका झालेला आहे. दरवर्षी जास्तीत जास्त रक्कम राखीव निधीकडे वर्ग करण्याचे आपले धोरण असून लवकरच एकूण राखीव निधी वसूल भाग-भांडवलाइतका होईल अशी अपेक्षा आहे.

अहवाल साली बँकेच्या ठेवींत रु. २५६·८६ लाखांची झालेली वाढ समाधानकारक आहे. सर्व बँकांच्या सरासरी वाढीपेक्षा आपल्या बँकेचे वाढीचे प्रमाण जास्त आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

बँकेच्या एकूण गुंतवणुकीत रु. ४५·५१ लाखांची वाढ झालेली असून ही जवळजवळ सर्व वाढ सरकारी व ट्रस्टी रोख्यांतच झालेली आहे. बँकेच्या गुंतवणुकीची पुस्तकातील

किंमत ही दर्शनी किंमत व बाजार भावाने होणारी किंमत या दोन्हीपेक्षा कमी आहे हे नमूद करण्यास मला विशेष आनंद वाटतो.

अहवाल साली बँकेच्या कर्जव्यवहारात विशेष समाधानकारक वाढ झालेली आहे याचा मला आनंद वाटतो. कर्जव्यवहाराचे ठेवींशी असलेले प्रमाण ६६ टक्के आहे. सन १९६७ मध्ये ते ५३ टक्के होते व गेल्या वर्षी ते ६१ टक्के होते याचा विचार करता या बाबतीतील आपल्या बँकेची प्रगती समाधानकारक आहे हे निःसंशय. शेती व लघु उद्योगधंदे यांना दिल्या गेलेल्या कर्जातही समाधानकारक वाढ झालेली आहे.

बँकेच्या नफ्यात अहवाल साली बरीच म्हणजे रु. १ लाखाहून जास्त वाढ झालेली आहे. ही वाढ समाधानकारक आहे. अहवाल सालाकरिता संचालक मंडळाने डिव्हिडंडमध्ये अर्ध्या टक्क्याची वाढ सुचवून ते रु. ९·५० टक्के द्यावे असे सुचविले आहे याबद्दल आपणांस संतोष वाटेल असे वाटते.

मला हे सांगण्यास विशेष आनंद आणि अभिमान वाटतो की, सातारा शहरात बँकेची स्वतःची वास्तू असावी ही आपली इच्छा लवकर पूर्ण होईल. अहवाल सालाच्या असेरीस बँकेने सातारा येथे पोवई नाक्यावरील एक जागा खरेदी केलेली असून तेथे बँकेच्या नियोजित इमारतीचे बांधकाम लवकर सुरू होईल असा विश्वास वाटतो.

### प्रत्येक देशाने आपले भवितव्य स्वतःच घडविले पाहिजे

मुंबई येथे भरविण्यात आलेल्या राष्ट्रीय विकाससंबंधीच्या परिसंवादात शिकॅगो विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रा. डॉ. लिआनार्ड वाईंडर ह्यांचे व्याख्यान झाले. पश्चिम आशिआसंबंधी त्यांनी जागोजागी हिंडून संशोधन केले आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले की विकासाच्या प्रक्रियेची शास्त्रशुद्ध मीमांसा करणारी विचारपद्धती अस्तित्वात नसल्यामुळे प्रत्येक देशाने आपल्या विकासाचा मार्ग स्वतःच शोधून काढला पाहिजे. त्याशिवाय विकासाचा म्हणजेच आधुनिकतेचा त्यांचा शोध यशस्वी होणार नाही. पश्चिम युरोपीय देशांतून आधुनिकतेचा झालेला अवतार हा अपघातात्मक समजला पाहिजे. परंतु आता मात्र इतर देशांत आधुनिकतेच्या पायऱ्या अधिक हेतुपूर्वक शोधण्यात येत आहेत. जगाच्या प्रत्येक व कोठल्याही भागात आधुनिकता आणता येण्यासारखी आहे हे आता सर्वांना माहीत झालेले आहे. दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनांत सुधारणा झाल्यामुळे ह्या जाणिवेचा प्रसार सर्वत्र झाला आहे. त्याचबरोबर साक्षरता आणि शिक्षण ह्यांचाही प्रसार आता मोठ्या प्रमाणावर झाला आहे अगर होत आहे. त्यामुळे ह्या जाणिवेची छाया हेतुपूर्वक करण्यात येत असलेल्या राजकारणावरही झालेली आहे. आर्थिक विकास म्हणजे काही एखादी शिडी नाही. शिडीच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवला की, बाकीच्या पायऱ्या क्रमाक्रमाने चढून जाण्याचेच काय ते उरते अशी समजूत असेल तर ती चुकीची म्हणावी लागेल. ज्याला आधुनिकता म्हणतात ती किंवा आधुनिक जीवनपद्धती इतकी सरळ-सोपी नाही. तीत अनेक परस्परविरोधी वळणे आहेत. विचार केला तर असे समजून येते की, ही आधुनिकता मोठी मनोरंजक आहे. पण त्याचबरोबर ती विविधांगी असून अनेक प्रश्नचिन्हे किंवा आव्हाने देणारीही आहे. इतिहासाच्या कोणत्याही कालखंडात हे असेच असते. आधुनिकतेचा शोध करणे ठीक आहे परंतु ती प्रत्यक्षात आणताना बुद्धीच्या निकषावर घासलेल्या हेतुपूर्वक मार्गाने व पावलांनी तिचा अवतार घडवून आणता येणार नाही. राजकीय, आर्थिक अगर सामाजिक बदल अशा पद्धतीने साकार करता येत नाहीत. प्रत्येक देशाचा सांस्कृतिक वारसा आणि परंपरा ह्यांत अनेक फरक असतात. त्यांची दखल घेतल्याशिवाय भागत नाही. म्हणून आर्थिक विकासाचा असा मूलभूत मंत्र उपलब्ध नाही ही गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे. प्रत्येक देशाने आपले भवितव्य स्वतःच्या हातांनीच घडविले पाहिजे.

### रेल्वेच्या डब्यांची थायलँडला निर्यात

पेरांबूर येथील रेल्वेचे डबे तयार करणाऱ्या कारखान्याने ४५ रेल्वे डब्यांची निर्यात थायलँडला केली आहे. हे डबे त्या देशाच्या रॉयल स्टेट रेल्वेसाठी मागविण्यात आले होते. ह्या कारखान्याने १९६७ साली दोन डबे नमुन्यादाखल पुरविले होते. ते समाधानकारक असल्याचे आढळून आल्यानंतर ४५ नव्या डब्यांची मागणी करण्यात आली होती. ही मागणी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन-मार्फत मिळाली. मागणीप्रमाणे माल पुरविण्याची तयारी प्रगत देशांतील काही बड्या रेल्वे साहित्याच्या कारखान्यांनी दाखविली होती. तरीही ह्या स्पर्धेत कारखाना यशस्वी ठरला. ह्या डब्यांची किंमत १२ लाख रुपये आहे. त्यांच्या निर्यातीमुळे ९ लाख रुपयांच्या परदेशी चलनाची प्राप्ती झाली आहे. निर्यात केलेल्या डब्यांत काही थोडे भाग परदेशी बनावटीचे आहेत.

### हृदयविकार असलेल्यांना सूचना

हृदयविकार असलेल्या लोकांनी लैंगिक सुखाची चव घेता-घेताने घ्यावी अशी सूचना मुंबई येथील हृदयविकाराच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या एका मंडळाने केली आहे. लैंगिक उपभोगात हृदयावर आणि मनावर खूप ताण पडतो आणि ह्या विकाराने पछाडलेल्या लोकांना तो धोकादायक असतो असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. त्याचप्रमाणे प्रमाणाबाहेर धूम्रपान करणेही ह्या रोगाला लवकर आमंत्रण देते. मुंबई कॉर्पोरेशनमधील आकड्यां-प्रमाणे एकूण मृत्यूंपैकी १२ टक्के मृत्यू ह्या रोगाने होत असतात. ह्या रोग पाश्चिमात्य देशांत सर्वांत अधिक बळी घेतो असे आढळून आले आहे. परंतु, आता भारतासारख्या मागास देशातही या रोगाचा धोका दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे.

## भारतात लोकसंख्येच्या मानाने कमी सैनिक

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शस्त्रनियंत्रण आणि निःशस्त्रीकरण विभागाने प्रसिद्ध केलेल्या एका प्रकाशनात भारत, पाकिस्तान आणि चीन ह्यांच्या लष्कराविषयी काही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रकाशनात १९६७ सालचे आकडे दिलेले आहेत. त्यावरून असे दिसते की, पाकिस्तान आणि चीन ह्यांच्याशी तुलना करता भारतात लोकसंख्येच्या मानाने कमी लोक लष्करात भरती झालेले आहेत. भारतात दर हजारी माणसांमागे दोन माणसे लष्करात आहेत तर पाकिस्तानात हे प्रमाण ३ व चीनमध्ये ४ आहे. भारताच्या ठोक राष्ट्रीय उत्पन्नापैकी ३·४ टक्के उत्पन्न लष्करावर खर्च करण्यात येते. पाकिस्तान आपल्या ठोक उत्पन्नापैकी ३·६ टक्के उत्पन्न लष्करावर खर्च करतो तर चीन ८·२ टक्के उत्पन्न खर्च करतो. काश्मीरविषयी भारताबरोबर असलेला तंटा कायम राखण्यात पाकिस्तानी लष्कराचे हितसंबंध कसे गुंतलेले आहेत ते दाखविणारा एक लेख न्यूयॉर्क टाइम्समध्ये प्रसिद्ध झाला आहे. लेखात असे म्हटले आहे की, सध्या भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत व्यापारी संबंध नाहीत. १९६५ साली ते तोडण्यात आले. परंतु ह्या व्यापारबंदीमुळे पश्चिम पाकिस्तानपेक्षा पूर्व पाकिस्तानचे अतिशय नुकसान होत आहे. भारताशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले तर काश्मीरमधील तंटा चालू ठेवण्याच्या धोरणाचा पायाच उखडल्यासारखा होईल. आणि मग अर्थातच पाकिस्तानच्या सैन्याच्या अस्तित्वाची गरज उघडी पडल्यासारखी होईल. म्हणून काश्मीरचा प्रश्न धुमसता ठेवण्यात येत आहे.

## अमेरिकेतील प्रवासी आगगाड्यांना वाईट दिवस

थोड्या अंतरांचे प्रवास सुखसोयीने करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अमेरिकेतील अनेक आगगाड्या हळूहळू बंद करण्यात येत आहेत.त्यांपैकी शिकॅगो ते सॅन फ्रॅन्सिस्को ह्या मार्गावर डौलाने धावणाऱ्या गाडीने आपला शेवटचा दैनिक प्रवास नुकताच केला. आता ही गाडी आठवड्यातून तीनदाच सोडण्यात येणार आहे. १९२० पर्यंत अमेरिकेत रेल्वेने प्रवास करणारांची संख्या वाढत होती. त्यानंतर मात्र मोटारी लोकप्रिय होऊ लागल्यावर त्यांची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मोटारींचे उत्पादन थांबविण्यात आले. शिवाय पेट्रोल आणि टायर्स ह्यांचे वाटप करण्यात येऊ लागले. त्यामुळे प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या आगगाड्यांना पुन्हा चांगले दिवस आले. युद्धानंतर पुन्हा रेल्वेने प्रवास करणारांची संख्या घटू लागली. त्यामुळे १९५० च्या सुमारास रेल्वे कंपन्यांनी आपल्या राजशाही आगगाड्या कमी करण्यास प्रारंभ केला. अमेरिकेत मोठ्या शहरांकडे जाण्यासाठी प्रवासी आता मोटारगाड्या, विमाने आणि सार्वजनिक बस ह्यांचा उपयोग अधिकाधिक प्रमाणात करतात. १९२९ साली अमेरिकेत प्रवासी वाहतूक करणाऱ्या २० हजार रेल्वेगाड्या होत्या. गेल्या वर्षअखेर त्यांची संख्या रोडावून ५०० वर आली. आता उरलेल्या ६० गाड्याही आपल्या शेवटच्या प्रवासाची वाट पाहात आहेत. अमेरिकेत अंतर्गत वाहतूक करणाऱ्या विमान कंपन्या गेल्या काही वर्षांत खूप वाढल्या. राजरस्त्याच्या सोयीही वाढल्या; आणि राज्याराज्यांतून प्रवास करण्याच्या व्यवस्था सुलभ झाल्या. ह्या सर्व घटनांचा आगगाड्यांच्या प्रवासी वाहतुकीवर परिणाम झाला.

## निसर्ग दूषित होत जाण्याचा धोका

यंत्रयुगातील औद्योगिक समाजरचनेमुळे निसर्गनिर्मित साधनसंपत्तीचा भरमसाठ वापर करण्यात येत आहे. त्यामुळे पृथ्वीवरील हवापाणी, इत्यादी दूषित होत चालल्याची जाणीव औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या देशांना झाली आहे. भारतात ही आपत्ती टाळण्याचे प्रयत्न होऊ घातले आहेत. रशियात आतापर्यंत ह्या प्रश्नाकडे कोणाचे लक्ष गेल्याचे आढळून आले नव्हते. भांडवलशाही देशात नैसर्गिक साधनसंपत्तीचा नफ्यासाठी वेडावाकडा उपयोग करण्यात येतो. म्हणून दूषित भौतिक परिस्थिती उत्पन्न होते असा प्रचार रशिया करीत आला आहे. वास्तविक निसर्गाचे नियम इतर देशांप्रमाणे रशियातही आपले काम करीत असतातच. राजकीय हेतूने त्या नियमांवर मल्लिनाथी करून भागत नाही. रशियात औद्योगीकरण जसजसे वाढत आहे तसतसे युरोप-अमेरिकेतील प्रश्नही तेथे निर्माण होत आहेत. कास्पिअन समुद्राच्या किनाऱ्यालगत खणलेल्या तेलविहिरींमुळे व्होल्गा नदीच्या मुखाजवळचे पाणी खराब होत असल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले आहे. रशियातील एक मोठा रासायनिक कारखाना दररोज १० लाख घनमीटर दूषित पाणी बाहेर सोडतो. ह्यावरून औद्योगीकरणामुळे होणाऱ्या अपायांची कल्पना येते. रशियन सरकार आता ह्या धोक्याकडे लक्ष देऊ लागले आहे. रशियाचे औद्योगीकरण प्रदेशाच्या विस्ताराच्या मानाने अद्यापही बाल्यावस्थेत आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बेफाम वापरामुळे उत्पन्न होणारे प्रश्न हाताबाहेर जाऊ न देण्याचे काही काळ तरी शक्य होईल असे दिसते.

## पीस कोअर व्हॉलंटिअर्सची राजकीय बैठक

अमेरिकेचे पीस कोअर व्हॉलंटिअर्स वेगवेगळ्या देशांत जाऊन कामे करतात. अशा रीतीने कामे करून अमेरिकेला परत आलेल्या ३५,००० पैकी २,००० व्हॉलंटिअर्सनी एक समिती स्थापन केली आहे.पीस कोअरचे विभाजन करून टाकण्यात यावे, अशी त्यांची मागणी आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणानुसार परदेशांना दिलेल्या मदतीवर पीस कोअर आधारित आहे आणि त्याच्या कार्यामुळे त्या त्या देशांवर गैरप्रकारे दडपण आणले जाते, असा ह्या व्हॉलंटिअर्सचा आरोप आहे. "अमेरिकन परराष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टांस पीस कोअरने नेहमीच पाठिंबा द्यावा अशी अपेक्षा नाही" असे पीस कोअरच्या डायरेक्टरने ह्या टीकेस उत्तर दिले आहे.

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं !

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : ३७६१०२


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)